# मेट्रो तीनचा पहिला टप्पा डिसेंबरमध्ये

## प्रशासनाचा विश्वास; आरे कारडेपो ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होणार

मुंबई, ता. १० : मुंबई मेट्रो तीनचे काम प्रगतिपथावर आहे. डिसेंबर २०२३ पर्यंत पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण होऊन आरे ते बीकेसी या मार्गावर मेट्रो धावेल, असा विश्वास मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने व्यक्त केला आहे. या पहिल्या मार्गावर मेट्रोच्या एकूण नऊ गाड्या धावणार असून दोन ट्रेनमधील कालावधीही कमी ठेवण्याचा मेट्रोचा प्रयत्न आहे; तर ऑक्टोबर २०२३ पर्यंत कारडेपो सुरू करून कार्यान्वित करण्यासंदर्भातील सर्व चाचण्या सुरू असल्याचेही मुंबई मेट्रोने सांगितले.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा मुंबई मेट्रो मार्ग-तीन मुंबईसाठी प्रस्तावित असलेला पहिला आणि एकमेव पूर्णपणे भूमिगत मेट्रो मार्ग आहे. शहरात वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच वाहतुकीच्या पर्यायी सुविधेसाठी मेट्रो-तीन मार्गाची अंमलबजावणी होत आहे. वर्ष २०३१ मध्ये दररोज १७ लाख प्रवासी या मार्गावर प्रवास करतील. प्रत्येक मेट्रो गाडीत २५०० प्रवाशांना प्रवास करता येईल. प्रत्येक गाडी ही तीन ते चार मिनिटांनी उपलब्ध असली, तरीही सदर मेट्रो गाड्या दर दोन मिनिटांच्या कालावधीत धावण्यास सक्षम आहेत, अशी माहिती मुंबई मेट्रोने दिली आहे.



**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मेट्रो तीनच्या कामाचा आढावा घेतला.

### ऑक्टोबरपर्यंत ट्रायल रन अपेक्षित

रेल्वे रुळाचे एकूण ८६.३ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. या मार्गावर मेट्रो सेवेची चाचणी ऑक्टोबरपर्यंत सुरू होणे अपेक्षित आहे. मेट्रो रेल सुरक्षा आयुक्त (सीएमआरएस) द्वारे मेट्रोची सुरक्षा चाचणी डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### दुसरा टप्पा जून २०२४ मध्ये

मेट्रो तीन मार्गाचे दुसऱ्या टप्प्यातील एकूण ७६.९ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यापैकी ९५.३ टक्के प्रकल्प बांधकाम; तर ८८.३ टक्के स्थानकांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. प्रणालीची ४२.४ टक्के कामे पूर्ण झाली आहेत; तर रेल्वेरुळाचे एकूण ४६.६ टक्के बांधकाम पूर्ण झालेले असून हा मार्ग जून २०२४ मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे.

### मेट्रो-३ च्या गाड्या मुंबईत

आतापर्यंत मेट्रो-३ च्या तीन गाड्या मुंबईत दाखल झाल्या आहेत व अजून दोन गाड्या श्रीसीटी आंध्र प्रदेश येथील ऑस्तोम कारखान्यातून मुंबईकरिता रवाना झाल्या असून दिनांक १७ ते १८ मेपर्यंत सदर गाड्या मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे. यानंतर उर्वरित ४ गाड्या प्रत्येक महिन्यात २ अशा मुंबईत दाखल होतील. सद्यस्थितीत डेपो ३१ गाड्यांच्या देखभालीसाठी सज्ज आहे.






### पहिला टप्पा ८७ टक्के पूर्ण

पहिल्या टप्प्यात धावणाऱ्या आरे ते बीकेसी या मार्गात एकूण १० स्थानके असून नऊ भुयारी; तर एक जमिनीवर आहे. हे अंतर १२.४४ किमी असून दोन गाड्यांमधील कालावधी ६.५ मिनिटे इतका असेल. या मार्गावर पहिल्या टप्प्यात ९ गाड्या धावतील. मेट्रो ३ मार्गाचे पहिल्या टप्प्यातील एकूण ८७.२ टक्के काम पूर्ण झाले आहे. ९७.८ टक्के प्रकल्प बांधकाम पूर्ण झाले असून एकूण ९३ टक्के स्थानक बांधकाम पूर्ण झाले आहे; तर एकूण ६५.१ टक्के प्रणालीची कामे पूर्ण झाले आहेत.

कफ परेड ते सीप्झ दरम्यान प्रस्तावित असलेल्या या मेट्रो मार्गाचे सद्यस्थितीत काम प्रगतिपथावर आहे. मेट्रो ३ सारख्या तांत्रिकदृष्ट्या कठीण प्रकल्प पूर्ण करण्याचे आव्हान कॉर्पोरेशनचे अधिकारी लीलया पेलत आहेत. डिसेंबर २०२३ पर्यंत आरे ते बीकेसी दरम्यान मेट्रो मार्गिका ३ सुरू करण्याचे नियोजित आहे. विधानभवन स्थानकाचे ८८ टक्के काम; तर चर्चगेट स्थानकाचे ८३ टक्के टकाम पूर्ण झाले आहे. मेट्रो ३ कार्यान्वित झाल्यावर ही दोन्ही स्थानके चाकरमान्यांसाठी वरदान ठरतील.

- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री